# विद्यापीठाच्या परीक्षा ३१ मार्चनंतर

## कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची माहिती

कोल्हापूर टाइम्स टीम

राज्यात करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून सर्व महाविद्यालय, विद्यापीठे ३१ मार्च,२०२० पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे तसेच ३१ मार्चच्या अगोदर नियोजित असलेल्या सर्व परीक्षा रद्द केल्या आहेत, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा तसेच विद्यापीठांतर्गत असलेल्या महाविद्यालयाच्या परीक्षा ३१ मार्चनंतर होतील.

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असलेली ग्रामीण व शहरी भागातील सर्व महाविद्यालये, विद्यापीठे तसेच परवानगी असलेले खासगी क्लासेस बंद असणार आहेत. २६, २७ दरम्यान राज्यातील करोनाबद्दलची परिस्थिती पाहण्यासाठी आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात येईल. या नियमांचे सर्व महाविद्यालयांनी आणि विद्यापीठांनी तंतोतंत पालन करणे बंधनकारक आहे.

दरम्यान, शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा २७ मार्चपासून सुरू होणार होत्या. मात्र सरकारच्या निर्देशानुसार करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून विद्यापीठ व महाविद्यालयीन परीक्षा ३१ मार्चनंतर होणार आहेत. याबाबत विद्यापीठाकडून महाविद्यालयांना अधिकृत सूचना देण्यात येतील, असे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्पष्ट केले.

# ओपन एअर थिएटरमध्ये झळकले
# 'कोल्हापूरचे वैभव'

## नगारखाना, साठमारी, रंकाळ्यासह, अंबाबाई मंदिराची छायाचित्रे लक्षवेधी

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

**टेंबलाईवाडी , ता. १७ : शिवाजी विद्यापीठातील 'ओपन एअर थिएटर'चे रुपडे पालटत आहे. या थिएटरमधील स्टेजच्या भिंतीवर कोल्हापूरचे वैभव झळकले आहे. नगारखाना, साठमारी, रंकाळा, अश्वारूढ छत्रपती शिवराय, अंबाबाई मंदिर, राधानगरी धरण, गवा व योगासनांची चित्रांची कलाकारी लक्ष वेधणारी ठरली आहे.**

रोमच्या ऑलिंपिक स्टेडियमच्या धर्तीवर कुस्तीसाठी खासबाग मैदान बनविले होते. कुस्ती मैदानासाठी आवश्यक असणारी नैसर्गिक जागा विमान बिल्डिंगच्या परिसरात उपलब्ध असल्याने तेथे ओपन एअर थिएटर बांधण्याचा तत्कालीन प्रशासनाने निर्णय घेतला.

ऑल इंडिया कौन्सिल ऑफ स्पोर्टस्‌चे अध्यक्ष विजय मर्चंट यांच्या हस्ते २१ एप्रिल १९६७ ला थिएटरचा पायाभरणी समारंभ झाला. इंडिया कौन्सिल स्पोर्टस्‌चे अध्यक्ष जनरल के. एम. करिअप्पा यांच्या हस्ते २६ नोव्हेंबर १९६७ ला थिटरचे उद्‌घाटन झाले. कालांतराने मातीच्या आखाड्याच्या ठिकाणी स्टेज बांधले. या स्टेजवरच मॅटवरील कुस्ती स्पर्धा घेण्यात आली.

ओपन थिएटरमध्ये ऑल इंडिया कुस्ती स्पर्धा दोन वेळा झाली असून, पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धा मॅटवर झाली. 'तुघलक' नाटकाचा प्रयोग येथे काही दिवसांपूर्वी सादर झाला. थिएटरच्या पायऱ्यांवर बसून स्पर्धा परीक्षेचे विद्यार्थी अभ्यास करतात. थिएटरमध्ये सार्वजनिक कार्यक्रम होण्यासाठी स्टेजच्या मागे भिंत बांधली आहे. या भिंतीवर कोल्हापूरचे वैभव झळकवले आहे. काही दिवसांपूर्वी भिंतीवर नगारखाना, साठमारी, रंकाळा, अश्वारूढ छत्रपती शिवराय, अंबाबाई मंदिर, न्यू पॅलेस, राधानगरी धरण, गवा यासह योगासनातील विविध प्रकार रेखाटण्यात आले आहेत. थिएटरच्या पायऱ्यांवर काही ठिकाणी गवत व झुडपे वाढली आहेत. काही पायऱ्या निखळल्या आहेत. त्यांची दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे.


टेंबलाईवाडीः शिवाजी विद्यापीठातील 'ओपन थिएटर' प्रेक्षणीय स्थळांच्या चित्रांनी असे सजले आहे.

### विद्यापीठातील सभागृह व बैठक क्षमता

- ओपन एअर थिएटर - २०००
- वि. स. खांडेकर भाषाभवन - ३६५
- राजर्षी छत्रपती शाहू सभागृह - २६०
- मानव्यशास्त्र सभागृह - १७५
- राजमाता जिजाऊ सभागृह - ४०००
- पदार्थविज्ञान, गणित व शिक्षणशास्त्र विभाग- प्रत्येकी १७०
- रसायनशास्त्र - २००
- संगीतशास्त्र, निलांबरी व पर्यावरणशास्त्र - प्रत्येकी १००

# विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना मास्क पुरवठा : डॉ. रानडे

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठातील सर्दी आणि खोकला असणाऱ्या अधिकारी व प्रशासकीय कर्मचाऱ्यांना मास्कचा पुरवठा केला जात आहे. ज्यांचे आरोग्य सुदृढ आहे, त्यांनी मास्क वापरण्याची गरज नाही. कॅश व कागदपत्रे हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांनी हात वारंवार धुवावेत,

ही सूचना केली आहे, अशी माहिती आरोग्य केंद्राच्या अधिकारी डॉ. व्ही. ए. रानडे यांनी दिली.

विद्यापीठाला भेट देणाऱ्या व्हिजिटर्सनासुद्धा मास्कचा पुरवठा केला जात असल्याचेही त्यांनी सांगितले. कोरोनाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी विद्यापीठात प्रतिबंधात्मक पावले उचलली आहेत. आरोग्य केंद्रातर्फे सर्दी-खोकला असणाऱ्या कर्मचाऱ्यांना मास्क व सॅनिटायझरचा पुरवठा केला जात आहे. कर्मचारी केंद्रात जाऊन मास्क घेत आहेत.

प्रशासकीय कामकाज सुरू असल्याने कर्मचारी हजर राहून कामाचा निपटारा करत आहेत. कोरोनापासून बचाव करण्यासाठी अधिकारी-कर्मचारी हस्तांदोलन न करणे, वारंवार हात धुणे, एकत्रित येऊन चर्चा करणे टाळत असल्याचे चित्र आहे.

## दृष्टिक्षेपात विद्यापीठ कर्मचारी

- प्रशासकीय अधिकारी आणि प्राध्यापक- २६२
- कायम कर्मचारी : ५५०
- रोजंदारी कर्मचारी- ६००



## शिवाजी विद्यापीठाकडून संगणक प्रणालीची निर्मिती; पदवी प्रमाणपत्र वितरणासाठी मदत

# ‘शिव-दीक्षान्त’ प्रणालीने वाचविला वेळ, श्रम

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांतील स्नातकांना पदवी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया यावर्षी ३० दिवसांमध्ये आटोपली. विद्यापीठाने तयार केलेल्या ‘शिव-दीक्षान्त प्रणाली’ने परीक्षा व मूल्यमापन मंडळासह स्नातकांचा वेळ, श्रम वाचविले.

पदवी प्रमाणपत्र देण्यासाठी स्नातकांचे अर्ज, शुल्क आकारणे, प्राप्त अर्जांची छाननी करणे, आदी प्रक्रियांमध्ये विविध अडचणी येत होत्या. श्रम, वेळ अधिक खर्च करावा लागत होता. त्यावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाने या अडचणी समजून घेतल्या. ‘ईपीएस इन्हान्समेंट प्रोजेक्ट’अंतर्गत या मंडळातील संगणकतज्ज्ञ आणि आयटी सेलच्या मदतीने ‘शिव दीक्षान्त प्रणाली’ची निर्मिती केली.

त्याला व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेऊन फेब्रुवारीमध्ये झालेल्या विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभासाठी या प्रणालीचा वापर केला. याअंतर्गत अर्ज स्वीकरणे, शुल्क भरणे, नावातील चुकांची दुरुस्ती, विविध त्रुटींची पूर्तता, आदी स्वरूपांतील प्रक्रिया ऑनलाईन राबविली. पूर्वी या सर्व प्रक्रियांसाठी किमान ६० दिवस लागत होते. मात्र, या नव्या प्रणालीमुळे ३ दिवसांमध्ये प्रक्रिया पूर्ण झाली. य कामगिरीबद्दल अधिसभेमध् सदस्यांनी परीक्षा मंडळाची प्रशंस केली.

### प्रणालीवर एकदाच खर्च

वेब मॉडेल स्वरुपातील या नव्या प्रणालीसाठी विविध स्वरुपांतील एकूण ५० हजार रुपयांचा खर्च झाला. यापुढे प्रणालीवर खर्च करावा लागणार नाही. पूर्वीच्या पद्धतीनुसार अर्जाची छाननी, दुरुस्ती करून यादी तयार करण्यासाठी किमान ४० दिवस लागत होते. अर्जातील दुरुस्तीनंतर या प्रणालीमुळे १० मिनिटांत संबंधित प्रक्रिया होऊन स्नातकांची यादी तयार झाली. विद्यार्थ्यांना त्यांच्या अर्जावर झालेल्या प्रत्येक कार्यवाहीची ऑनलाईन, तर विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना मोबाईल ॲपद्वारे पदवी प्रमाणपत्रांबाबतची संख्यात्मक माहिती मिळाली असल्याचे या प्रणालीचे मुख्य समन्वयक श्रीनिवास माने यांनी सांगितले.




### आकडेवारी दृष्टिक्षेपात

- पेमेंट गेट-वेद्वारे शुल्क स्वीकारलेल्या अर्जदारांचे प्रमाण : ९९ टक्के
- ३६०० विद्यार्थ्यांच्या अर्जातील त्रुटींची ऑनलाईन पूर्तता
- यंदा वितरित केलेली पदवी प्रमाणपत्रे : ६०१६७.

विद्यापीठाची स्वनिर्मिती असलेल्या शिव दीक्षान्त प्रणालीकरिता परीक्षा मंडळाला आयटीसेल, लेखा विभागाचे मोठे मार्गदर्शन लाभले. या प्रणालीने परीक्षा मंडळातील कर्मचाऱ्यांसह अर्जदार विद्यार्थ्यांच्या श्रमात आणि वेळेमध्ये बचत झाली. ज्यांना अर्जंट डिग्री (पदवी प्रमाणपत्र) हवी, त्यांना कधीही या नव्या प्रणालीत अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

**- जी. एस. पळसे**, प्रभारी संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ